# चीनी नववर्ष २०१९ : वराहाचे [डुकराचे] वर्ष

## झूंगन् आणि ओश्कि

### चीनी नववर्ष २०१९च्या सन्मानार्थ एक कथा

चीनी राशी चक्र, बारा वर्षांच्या चक्रावर आधारित आहे, ज्यातील प्रत्येक वर्ष हे एका विशिष्ट पशूशी निगडित असते. ते विशिष्ट वर्ष आणि त्या वर्षात जन्माला आलेले लोक हे दोन्हीही त्या वर्षाशी निगडित असलेल्या प्राण्याचे गुण व्यक्त करतात असे मानले जाते.

या वर्षी चांद्र तीथीनुसार, चीनी नववर्ष मंगळवार, ५ फेब्रुवारीला सुरू होत आहे. हा दिवस वराहाच्या [डुकराच्या] वर्षाच्या प्रारंभाचा संकेत देते आहे, जे बारा वर्षीय राशी चक्राचे बारावे वर्ष आहे. असे मानले जाते की, डुकराच्या वर्षी जन्माला आलेले लोक उदार, मनमिळाऊ, विश्वासपात्र, निष्ठावान असतात.

***

अनेक वर्षांपूर्वी, उत्तर अमेरीकेतील एका मोठ्या सरोवराकाठी दोन लहान डुकरे अन्नाचा शोध घेत होते. ती दोन्ही डुकरे एकमेकांची भावंडे होती आणि अजूनही ती वयाने अगदी लहान होती. ती दोन्ही भावंडे थोडीशी बारीक जरी असली, तरीही ती अतिशय सुंदर होती.

भुकेलेली असूनही ती आनंदाने नाचत-बागडत होती. ती धुळीत लोळत होती, आपल्या लांबलचक नाकाच्या गुलाबी शेंड्याने ती एकमेकांचा वास घेत होती व ढुशा देत होती आणि त्यांच्या सभोवताली असलेल्या गवताळ टेकाडांकडे कुतूहलाने पाहत होती. निश्चितच त्यातील काही रोपे चघळून खाण्यास चविष्ट असावीत असा विचार करत होती.

त्यांना एक हिरवळीचा पट्टा दिसला जो मजेदार वाटत होता, असे वाटत होते की ते गवत चविष्ट असणार, तेवढ्यात कुठूनतरी एक अनोळखी आवाज ऐकू आला. कुठून आला कोणास ठाऊक. *धम्, धम्, धम्.* डुकरे थबकली, ती चोरट्या नजरेने सभोवार पाहू लागली. काय असावे बरे ते?

*धम्, धम्, धम्.* पुन्हा एकदा आवाज आला आणि तो आवाज मोठमोठा होत जातो आहे असे वाटत होते. दोन्ही डुकरे तुरुतुरु धावत जाऊन गवताच्या मागे दबा धरून बसली. विस्फारलेल्या डोळ्यांनी ती एकमेकांकडे टक लावून पाहू लागली.

आणि मग — काहीच नाही. एकदम शांतता.

त्यातील मोठ्या डुकराने सावधपणे एक पाऊल पुढे टाकले. त्याने आपले नाक गवतातून तसूभर पुढे सरकवले की अचानक एक आवाज ऐकू आला. एक मोठी, लाकडी काठी हेलकावत त्याच्याकडे आली. ते किंकाळले आणि मागे जाऊन त्याच्या भावावर जाऊन आदळले.

डुकरांची अशी धांदल उडालेली होती, तेवढ्यात त्यांना दिसले की दोन चमकदार डोळे त्यांच्यावर रोखलेले आहेत. थोड्याच वेळात एका वृद्ध महिलेचा चेहरा त्यांच्या नजरेस पडला, तिच्या वाढत्या वयानुसार तिच्या चेहऱ्यावर जितक्या सुरकुत्या होत्या तितकाच तो करूणामय होता. तिच्या खांद्यावर एक काळ्या रंगाची लाकडी बास्केट होती जिच्यामध्ये पाईन वृक्षाची पाने भरलेली होती.

“अरे!” आपली चालण्याची काठी मागे घेत ती वृद्ध स्त्री म्हणाली. “तुम्ही कोण आहात? अरे लहानग्यांनो, तुम्ही इथे एकटे आहात का?”

डोळ्यांची उघडझाप करीत दोन्ह पिल्लांनी तिच्याकडे पाहिले. तिने सभोवताली निरखून पाहिले; डुकरांची आई दृष्टीस पडत नव्हती.

“या तर मग — माझ्या बास्केटमध्ये बसा. तुम्ही भुकेले दिसत आहात. मी तुम्हाला जवळच असलेल्या शॉबिटाउन गावामधील माझ्या घरी घेऊन जाते आणि मी शक्यतोवर तुमचे उत्तमपणे संगोपन करेन.”

तिचा आवाज मृदू, दिलासादायक होता. जिज्ञासेने ती डुकरे तिच्याकडे जाण्यास निघाली. त्यांच्या डोक्यावर गोंजारत ती पुन्हा म्हणाली “या.” जमा केलेल्या पाईन वृक्षांच्या पानांच्या मऊ गादीवर तिने त्यांना हळुवारपणे उचलून बसवले आणि मग ते सर्व शॉबिटाउनकडे जाण्यास निघाले.

ती स्त्री हातातील बास्केट झुलवत चालली होती. अनेक वर्षे ती एकटी राहात होती आणि आपल्या एकलकोंड्या अवस्थेची तिला जरी सवय झालेली असली, तरी पण आतल्याआत मात्र ती दुःखी होती.

ती सहवासासाठी आसुसलेली होती. त्या दोन डुकरांकडे तिने जेव्हा पाहिले, तेव्हाच आपल्या हृदयात काहीतरी खळबळ होत असल्याचे तिला जाणवले, तिच्या अंतरातील ते कोपरे जे आतापर्यंत निरुत्साहाचा आणि दुर्लक्षितपणाचा अनुभव घेत होते त्या कोपऱ्यांमध्ये आता जिव्हाळ्याची ऊब पसरू लागली होती. तिची फक्त एकच इच्छा होती की त्या बाळांसाठी गरम-गरम जेवण बनवावे.

ती राहात असलेल्या शॉबिटाउन गावात जेव्हा ते पोहोचले, तेव्हा तिने नेमके तेच केले. तिने त्यांच्यासाठी मक्याच्या पिठाची लापशी बनवली आणि ती दोन्ही पिल्ले पटापट ती लापशी चाटूनपूसून खात असताना ती त्यांच्याकडे पाहत राहिली, खाताना ते करत असलेल्या सुखद चित्कारांनी तिचे घर भरून गेले होते. जेव्हा त्यांचे जेवण आटोपले, तेव्हा तिने त्यांच्यासाठी गवताचा एक बिछाना बनवला. त्यावर ती पिल्ले झोपी जात असताना तिन त्यांच्यासाठी कोमल आवाजात अंगाई गीत म्हटले.

दुसऱ्या दिवशी पहाटे ती वृद्ध स्त्री बाहेर बसली आणि झोपडीच्या सभोवार असलेल्या मोकळ्या जागेचा शोध घेणाऱ्या पिल्लांकडे पाहू लागली. सूर्यप्रकाशाची धूसर किरणे गवतावर क्रीडा करत होती आणि ती पिल्ले त्या किरणांच्या ऊबेमध्ये ऊन खात होती. ती स्त्री काही काळ त्यांना न्याहाळत राहिली, तिच्या चेहऱ्यावर स्मित हास्य उमटले. आणि मग तिला जाणीव झाली की, आपण यांना नावे तर दिलीच नाहीत!

निरनिराळ्या पर्यायांचा विचार करताकरता ती एका निष्कर्षाला पोहोचली — त्यांना झूंगन् आणि ओश्कि ही नावे द्यावीत.

***

त्या वृद्ध स्त्रीच्या संगोपनामुळे ती डुकरे झपाट्याने मोठी झाली. ती बलवान आणि सुदृढ झाली आणि त्यांचा स्वभाव मात्र नेहमीप्रमाणे मधुरच राहिला. विशेषतः झूंगन्मध्ये नक्कीच काहीतरी विशेष होते. त्या वृद्ध स्त्रीलाही कधीकधी वाटे की, तो बाहेरून जितके दर्शवतो त्याहून त्याला अधिक समज आहे.

झूंगन् आणि ओश्कि तिच्यासमवेत राहावयास आल्यापासून साधारण सहा महिन्यांनी एके दिवशी, त्या गावात एक मोठी मेजवानी आयोजित केली गेली. त्या मेजवानीत इतका गोंगाट होता की त्यात भाग घेणे म्हणजे त्या स्त्रीला योग्य वाटले नाही, परंतु त्या गावातील लोक तिला भेटण्यासाठी आणि तिला थोडे जेवण पोहोचवण्यासाठी तिच्याकडे आले होते.

त्यामुळे मध्याह्नानंतर तीन धिप्पाड पुरुष जेव्हा तिच्या घराच्या दारापाशी आले, तेव्हा तिला त्याविषयी फारसे विशेष असे काही वाटले नाही.

एक माणूस पुढे आला. "नोकोमिस् — आजीबाई — आम्ही इकडून जात होतो, तेव्हा तुमची डुकरे नजरेस पडली. किती धष्टपुष्ट दिसतात ती! किती आनंदी! तुम्ही स्वतःच त्यांना वाढवले आहे का?"

खुशामतीमुळे ती वृद्ध स्त्री थोडी सुखावली.

"असे बोलून तुम्ही आपली सहृयताच व्यक्त करत आहात," ती म्हणाली. "का बरे, होय ती पिले लहान असल्यापासून मी त्यांना वाढवले आहे. यातील तो मोठा"— तिने झूंगन्‌कडे बोट दाखवले, जो झोपडीपासून दूरवर उभा होता आणि अतिशय सावधपणे पाहात होता — "तो झूंगन् आहे. आणि त्याचा लहान भाऊ, आता तुम्ही ज्याला शेतातून आत येताना पाहता आहात, तो ओश्कि आहे."

"खरंच, त्यांची देखभाल करून तुम्ही फार मोठे काम केले आहे. आतापर्यंत आम्ही पाहिलेल्यांपैकी सर्वोत्कृष्ट डुकरे हीच आहेत." त्या माणसाने आपल्या सोबत्याकडे पाहिले ज्याने समर्थनार्थ मान हलविली. "ती डुकरे आता पूर्णपणे मोठी झाली असतील, बरोबर ना?"

"होय," त्या वृद्ध स्त्रीने उत्तर दिले. "पण मला जेव्हा ती सापडली होती, तेव्हा तुम्ही त्यांना बघायला हवे होते."

इतकी हडकुळी आणि इतकी छोटीशी होती ती, तरीदेखील मी अगदी चांगल्या प्रकारे त्यांना धष्टपुष्ट बनवू शकले. होय, मी तर म्हणेन की आता ते खूपच छान, मोठे झाले आहेत."

"निशिन् — छान, छान," तो मनुष्य काहीसा विचलित होऊन म्हणाला. त्याचे डोळे झूंगन्‌वर रोखलेले होते.

तो पुन्हा त्या स्त्रीकडे वळला. "नोकोमिस्, तुम्ही आमच्यासोबत तंबाखू खाणार नाही का? आज मेजवानीचा दिवस आहे आणि ती थोडीशी तुम्हालाही देणे हे आमच्यासाठी गौरवास्पद ठरेल."

त्या स्त्रीने आनंदाने तंबाखूचा स्वीकार केला. तंबाखूची भेट देणे ही त्या गावामधील पवित्र प्रथा होती. शिवाय, ती माणसे अतिशय सभ्य दिसत होती. त्या वृद्ध स्त्रीने आपल्या पाहुण्यांना झोपडीत नेले आणि त्यांना बसण्याची विनंती केली.

काही वेळानंतर, त्यातील एक मनुष्य म्हणाला, "नोकोमिस्, तुझ्याकडील ही डुकरे खरोखरच सुंदर आहेत."

त्या स्त्रीने पुन्हा त्याच्याकडे पाहिले. काही कारणामुळे ती त्याचा चेहरा पूर्णपणे ओळखू शकली नाही — तिला काहीसे अंधुकसे दिसत होते. अचानकच तिची विचारप्रक्रिया सुस्त झाली होती. त्यावेळची परिस्थिती हाताळायची छोटीशी संधी जरी तिला मिळाली असती, तरी तिच्या कदाचित लक्षात आले असते की, त्यांनी तिला दिलेल्या तंबाखूमध्ये काहीतरी गडबड आहे, त्या तंबाखूमध्ये कुठलेतरी मादक द्रव्य मिसळले गेले आहे — आणि अर्थातच, त्या माणसांचा उद्देश काही चांगला नाही.

तथापि अशा प्रकारच्या एखाद्या विश्लेषणाप्रति विचार करण्याची तिची क्षमता कमजोर झाली होती.

“हूंऽ. . . ” एवढेच काय ते ती बोलू शकली.

“तुमची डुकरे, नोकोमिस्.”

असे म्हणेपर्यंत त्या वृद्ध स्त्रीला गुंगी आली आणि तिचे डोळे मिटले गेले. ती स्वतःशीच हसत होती. शेवटी जणू काहीतरी बोलण्यासाठी तिने आपले तोंड उघडले पण तिने फक्त गायलाच सुरुवात केली, अगदी बेसूरपणे. “छान, छान, सर्वकाही छान आहे. . .” ती अगदी हरवल्यागत गात होती.

त्या मनुष्याला वाटले की ही एक चांगली संधी आहे. “नोकोमिस्, कृपा करून या तुझ्या डुकरांपैकी एक डुक्कर तू आम्हाला विकशील का?”

ती स्त्री फक्त गातच राहिली. “छान, छान, सर्वकाही छान आहे. . .”

“ते छोटे डुक्कर विकणार का?” त्या माणसाने विचारले. सर्वकाही त्याच्या मनासारखे घडत चालले होते आणि त्याला आता आणखीन जोखीम घ्यायची नव्हती आणि मग ती स्त्री जर शुद्धीवर आली तर?

“छान, छान, सर्वकाही छान आहे. . .”

“उत्तम. तर मग तू जाऊन त्याला घेऊन येशील का?” त्या माणसाने विचारले. त्याने आपला हात पुढे केला.

अजूनही आपल्याच तंद्रीत असलेल्या त्या स्त्रीने त्याचा हात पकडला आणि ती लटपटत चालू लागली. त्या माणसाने तिला झोपडीच्या दाराशी चालवत आणले, तिथे ती गात म्हणाली, “ओश्कि! ओश्कि! इकडे ये!”

काही वेळापासून ती डुकरे झोपडीच्या बाजूला असलेल्या गवतामध्ये लपून राहिली होती. त्यांनी त्या वृद्ध स्त्रीचे त्या माणसांबरोबर झालेले संभाषण पूर्णपणे ऐकले होते, प्रत्येक शब्दागणिक त्यांचे डोळे विस्फारत होते. त्या वृद्ध स्त्रीने ओश्किच्या नावाने जेव्हा हाक मारली, तेव्हा त्याने आपल्या भावाकडे पाहिले, तो घाबरला होता.

"भाऊ, आलेली ही माणसे विचित्र आहेत. त्यांनी मला घेऊन जावे हे मला मान्य नाही. कुठले तरी संकट येऊ घातले आहे." ओश्किचा चेहरा भीतीने थरथर कापू लागला.

झूंगन्‌ने आपले मस्तक भावाच्या मस्तकावर घासले आणि मृदुलतेने तो म्हणाला :

"मला क्षमा कर ओश्कि. मी जर तुझे भाग्य बदलू शकलो असतो, तर बरे झाले असते. तरीदेखील मी एवढेच म्हणेन : तू जिथे कुठे जाशील, तुझ्याबाबतीत जे काही घडेल, तरीही जलसरोवरात स्नान सतत स्नान करण्याचे स्मरणात ठेव. सतत त्या सरोवरात स्नान कर, तिथे तुला असा सुगंध येईल की तो देवदारच्या अत्तराप्रमाणे वाटेल, असा सुगंध जो कधीही लुप्त होत नाही."

झूंगन् जेव्हा असे बोलत होता, तेव्हा ती वृद्ध स्त्री त्या झोपडीच्या दाराशी अजूनही उभी होती. मादक द्रव्याचा असर कमी होत चालला होता. तिने जेव्हा आपल्या डुकराचे बोल ऐकले, तेव्हा त्या शब्दांनी तिचे हृदय द्रवित झाले.

अजूनही तिच्या झोपडीतच असलेल्या त्या माणसांकडे ती वळली, तिचे डोळे अश्रूंनी भरले होते. त्या माणसांनीही तिच्याकडे पाहिले, त्यांच्या भुवया उंचावल्या होत्या, त्यांचे चेहरे पडले होते. त्यांनीदेखील झूंगन्‌चे शब्द ऐकले होते. एक डुक्कर कोड्यात टाकणाऱ्या भाषेत आणि विरोधाभासी पद्धतीने बोलते आहे! त्याचा अर्थ काय?

"निघून जा इथून," ती वृद्ध स्त्री कणखर आवाजात म्हणाली. "माझी डुकरे तुम्हाला किंवा इतर कोणालाही विकण्यासाठी नाहीत."

त्या माणसांनी विरोध केला नाही. त्यांनी अस्पष्ट स्वरात दिलगिरी व्यक्त केली आणि मग ते पुटपुटले की, त्या दिवशी त्यांना करायला इतरही अनेक कामे आहेत. ते तिथून बाहेर पडले पण त्या स्त्रीकडे आणि तिच्या डुकरांकडे एक शेवटचा आश्चर्यजनक दृष्टीक्षेप टाकतच.

ही बातमी त्या गावात वाऱ्यासारखी साऱ्या गावात पसरली आणि लवकरच, जे काही घडले ते गावाच्या मुखियाच्या कानावर गेले. त्याला अतिशय उत्सुकता वाटली म्हणून तो ज्या झोपडीत आपल्या कुटुंबासह राहात होता तेथे त्याने त्या वृद्ध स्त्रीला आणि तिच्या डुकरांना बोलावले.

त्याने विनम्रतेने त्यांचे स्वागत केले आणि अत्यंत उदारपणे त्यांना मेजवानी दिली. त्यानंतर त्याने त्याच्या मनात जे काही होते ते बोलून दाखवले. "झूंगन्, मी असे ऐकले आहे की तू नुकतेच काही महान ज्ञान सांगितले आहे. पण जे काही तू सांगितलेस ते मला फार गूढ वाटते आहे." 'जलसरोवरात स्नान कर आणि तो सुगंध मिळव जो कधीही लुप्त होणार नाही.' याचा काय अर्थ आहे?

मुखियाच्या बोलण्यावर झूंगन्ने स्मित केले आणि उत्तर दिले : "जलसरोवर म्हणजे प्रेम आहे, आणि प्रेम हाच तो सुगंध आहे जो कधीही लुप्त होत नाही. मी माझ्या लहान भावाला हे सांगत होतो की हे जग सोडून जाण्याची तुझी वेळ जरी आली असली, तरीही दुःखी होऊ नकोस. आम्ही नोकोमिस्सोबत इतके चांगले जीवन जगलो आहोत. प्रेम काय असते हे तिने आम्हाला दाखवले. मला वाटत होते की, ओश्किने हे जाणावे की, या देहाचा नाश जरी झाला, तरी हे प्रेम जे आम्हाला कळले आहे — हे प्रेम जे आपल्या सभोवताली आहे आणि जे आपल्या अंतरात आहे, जे आपले सत्त्व आहे आणि जे आपल्याला सर्वांशी जोडून ठेवते — ते नष्ट होत नाही."

मुखिया क्षणभर स्तब्ध झाला आणि मग त्याने प्रशंसा करण्यासाठी मान डोलावली — एकदा, दोनदा, तीन वेळा.

"तू खरोखरच हुशार आहेस झूंगन्, तो म्हणाला आणि मला वाटते तुझ्यासारखे उपदेश करणारे गावाच्या कारभारासाठी अनमोल आहेत. तू माझ्या कुटुंबासमवेत माझ्या घरात राहशील का? वास्तविक तुम्ही सर्वांनी आमच्यासोबत एकत्र राहावे — जर तुझा भाऊ आणि नोकोमिस् हेदेखील येथे राहावयास आले तर मला अत्यंत गौरवास्पद वाटेल."

आणि मग तसेच घडले. ती दोन डुकरे आणि दयाळू वृद्ध स्त्री जिने त्यांना घरी नेले होते त्या सर्वांनी आपले उर्वरित जीवन मुखिया आणि त्याच्या कुटुंबासमवेत व्यतीत केले. ते आरामात राहिले, एका उद्देशासह जगले — त्यांचा दयाळूपणा आणि प्रज्ञान, त्यांची विनम्रता आणि इमानदारी, एक आदर्श आणि प्रेरणा बनले, त्या सवासाठी ज्यांनी त्या मार्गाचा अवलंब केला.

© २०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित

ही कथा एका जातक कथेने प्रेरित आहे, जी भगवान बुद्धांच्या विभिन्न अवतारांविषयी पौराणिक कथा आणि प्रसंगांचे एक संकलन आहे.